जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**प्रेसनोट दिनांक - ०५/०३/२०२५**

## ३५ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा- २०२५ ठाणे शहर येथे पुणे शहर व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय संघाला घवघवीत यश मा.अमितेश कुमार, पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे कडुन खेळाडुंचे कौतुक...

दि.२२/०२/२०२५ ते ०१/०३/२०२५ रोजी दरम्यान ठाणे शहर पोलीस आयुक्तालय आयोजित ३५ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा पार पडली. सदर स्पर्धेत सहभागी पुणे व पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय संघाने अॅथेलेटिक्स,हॅन्डबॉल,हॉकी,कबड्डी, व्हॉलीबॉल,फुटबॉल, बास्केटबॉल, खोखो, कुस्ती, ज्युदो, बॉक्सिंग, वुशु, तायक्वांदो,स्विमींग,वेटलिफ्टींग,बॉडीबिल्डींग,रायफल शुटींग अशा खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होवुन घवघवीत यश संपादन केले.

**❖ स्पर्धेमध्ये पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयाने एकूण ७८ पदके प्राप्त करुण महाराष्ट्र राज्य पोलिस क्रीडा स्पर्धमधील आजपर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे यामध्ये २१ सुवर्ण पदके, २३ रजत पदके, ३४ कांस्य पदके प्राप्त केली आहेत.**

**❖ सांघिक व वैयक्तीक मिळुण एकुण १४८ खेळांडुना पदक प्राप्त झाले आहेत.**

**❖ हॅन्डबॉल पुरुष,हॉकी पुरुष,कबड्डी महिला संघांनी स्पर्धेमध्ये व्दितीय स्थान प्राप्त केले.**

**❖ महिला खो-खो व महिला व्हॉलीबॉल संघाने स्पर्धेमध्ये तृतीय स्थान प्राप्त केले.**

**❖ ९२३ गुणांसह स्पर्धेमध्ये सलग दुसया वर्षी महिला खेळाडु यामिनी ठाकरे यांना स्पर्धेतील ऊकृष्ठ**

**महिला खेळाडू हा किताब मिळाला.**

**❖ अॅथलेटीक्स खेळाडु अली शेख यांनी गोळाफेक क्रीडा प्रकारात १४.०५ मी गोळा फेकुन नवीन स्पर्धाविक्रम करीत सुवर्ण पदक प्राप्त केले आहे.**

**❖ बॉक्सिंग-वंदना सावंत, कुस्ती- प्रगती ठोंबरे, तायक्वांदो- स्वप्नाली घेमुड, बॉडीबिल्डींग-प्रविण खोब्रागडे या सर्वांना ऊकृष्ठ खेळाडू हा किताब मिळाला.**

**❖ स्पर्धेत एकुण १३ संघांनी सहभाग घेतला होता यामध्ये महिला संघाने तिसरे व पुरुष संघाने पाचवे स्थान प्राप्त केले.**

**❖ शुटींग क्रीडाप्रकारामध्ये महिला व पुरुष संघाने सांघिक विजेतेपद पटकवत खेळाडु राजेंद्र पाटील व अनिल उपरे यांना ऊकृष्ठ खेळाडू हा किताब मिळाला.**

सदर कार्यक्रमा करीता मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,प्रशासन पुणे शहर, श्री.अरविंद चावरीया मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे शहर श्री.शैलेश बलकवडे मा.पोलीस उपआयुक्त, मुख्यालय पुणे शहर डॉ.संदिप भाजीभाकरे व मा.पोलीस उपआयुक्त, मुख्यालय पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय श्री. विवेक पाटील यांनी खेळाडुंचे कौतुक केले.







महाराष्ट्र पोलीस
पुणे पोलीस
Pune Police